दै. सामना दि. 02.03.25

# भोकर शहरातील गांधी चौक परिसरात ३ ठिकाणी घरफोडी

**भोकर :** शहरात मागील काही दिवसापासून चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, २८ फेब्रुवारी रोजी गांधी चौक परिसरात तब्बल ३ ठिकाणी घरफोडी झाल्याची घटना घडल्याने नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

भोकर शहरातील सध्या कायदा व सुव्यवस्था पोलीस प्रशासनाच्या हतबलते मुळे कोलमडल्याचे निर्देशनास येत असुन घरफोडी, मोटारसायकल चोरी, भरदिवसा चैन चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढतच चालल्या आहेत. शहरातील सर्वाधिक सुरक्षित समजल्या जाणाऱ्या गांधी चौक परिसरात दि.२८ फेब्रुवारच्या रात्री चोरट्यांनी धुमाकूळ घालत यज्ञेश भोकरकर, संतोष कंठाळे व नारायण सादुलवार या तीन ठिकाणी घरफोडी करत रोख व ऐवज पळवला. विशेष म्हणजे रात्रीच्या गस्तवर असलेल्या पोलीस कर्मचारी व चोरट्यांने मध्ये लपाछपीचा खेळ बराच वेळ चालला. परंतु गल्ली बोळाचा फायदा घेत व हेतु साद्य करत सदर चोरटे फरार झाल्याचे सी.सी.टि.व्हि.कॅमेरात चित्रीत झाले आहे. घरफोडी घटनेतील घरमालक बाहेरगावी गेलेले असल्याने नेमका ऐवज किती गेला. घरमालक आल्यानंतर रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

## दुचाकी चोरीप्रकरणी आरोपी ताब्यात

२५ फेब्रु. रोजी बसस्थानकाजवळील पारस ज्युस सेंटर समोरून मारोती पुजारवाड, रा.नागापूर याची एम.एच २६-झेड ०७०५ क्रमांकाची मोटारसायकल सायंकाळच्या सुमारास चोरीला गेली होती. याबाबत भोकर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासा दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार सदाशिव ऊर्फ सदानंद शंकर गोरे, रा.नागापूर या आरोपीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता यासह इतर होंडा शाईन एमएच २६-सी एस ०८६७, स्पेंटर प्लस एमएच २६-एस-२९०९ क्रमांकाच्या दोन मोटारसायकल चोरी केल्याचे निष्पन्न



झाले. अरोपीकडून एकूण १ लाख ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून या प्रकरणा प्रमाणे शहरात घडलेल्या महिलेच्या गळ्यातील चेनचोरी, मोंढा परिसरातील दुकानफोडी अशा इतर घटनांची तत्परतेने चौकशी करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.